॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Fax : (02462) 215572** **Public Relations Office (PRO)** **website: srtmun.ac.in**

**Phone: (02462) 215325** **जनसंपर्क कार्यालय** **E-mail: pro@srtmun.ac.in**

संदर्भ क्र.: ज.का./२०२४-२५/२६१ दि.२६/१२/२०२४

**पेट-२०२४ परीक्षेबाबत अफवांवर विश्वास ठेवू नये- प्र.संचालक हुशारसिंह साबळे**

**परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणेच होणार आहे**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे आयोजित पीएच.डी. प्रवेशपूर्व परीक्षा पेट-२०२४ ही नियोजित वेळापत्रकानुसार म्हणजेच दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी ११:०० ते २:०० वा. या वेळेमध्ये प्रवेशपत्रावर दिलेल्या केंद्रावरच होणार आहे. असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र.संचालक हुशारसिंह साबळे यांनी कळविले आहे.

विद्यार्थ्यांना लॉगिनद्वारे मिळालेल्या प्रवेशपत्रावर परीक्षा केंद्राचे नाव, विषय व वेळ इत्यादी दर्शविलेले आहे. त्यामध्ये कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. त्यामुळे दि. २८ डिसेंबर रोजी परीक्षा सुरू होण्यापूर्वी अर्धा तास अगोदर म्हणजेच सकाळी १०:३० वा. विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे. याबाबतीत समाज माध्यमावर फिरत असलेल्या पत्रावर अथवा कोणत्याही प्रकारच्या संदेशावर विश्वास ठेवू नये. अथवा कोणतेही अफवांवर विश्वास ठेवू नये. जर दि. २८ डिसेंबर रोजीच्या पेट-२०२४ परीक्षेसाठी विद्यार्थी अनुपस्थित राहिला तर ती सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. याबाबत विद्यापीठाकडून कोणत्याही प्रकारची दखल घेतली जाणार नाही, असेही परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र.संचालक हुशारसिंह साबळे यांनी कळविले आहे.

---